# प्रेसनोट

चोपडा शहर पोलीसस्टेशन
दिनांक २७/१०/२०२५

## मध्यरात्री धोकादायक व प्राणघातकहत्यारे घेवुन रस्तालुटीसाठी थांबलेले ०७ आरोपी चोपडा शहर पोलीसस्टेशनकडुन जेरबंद

चोपडा शहरामध्ये शिरपुर बायपास रोडवर एका पांढ-या रंगाच्या गाडीमध्येसंशयीत इसम बराच वेळ थांबलेले
असल्याबाबत चोपडा शहर पोलीसस्टेशनचे पोलीस निरीक्षकश्री मधुकर साळवे यांना दिनांक २७/१०/२०२५ रोजी मध्यरात्री
०२-३० वा चेसुमारासगोपनीय बातमी मिळालीहोती. त्याअनुषंगानेतात्काळ पोलीस पथकतयारकरूनसंशयीतगाडीचा शोध
घेतला असता रणगाडा चौकाच्या थोडे पुढे, शिरपुर बायपास रोडच्या बाजुला पांढऱ्या रंगाचीस्विफ्ट डिझ
ायरचारचाकीकारक्र.MH २६ CH १७३३ ही थांबलेली, सदर गाडीच्या बाहेर दोघेजण लक्ष ठेवुन उभे असलेले व पाच
जण आतमध्ये बसलेले असे एकुण सात संशयीत इसम मिळुन आले. पोलीसांना पाहुनत्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला
परंतु  पोलीस पथकानेतात्काळ घेराव घालुनसदरच्या सातही इसमांना पकडले. सदर इसमांचीतसेच त्यांच्या मो.कारची झ
डती घेतली असता दोन इसमांच्या कंबरेला लोडकरण्यात आलेले गावठी कट्टे मिळुन आले.त्याचप्रमाणेगाडीमध्ये दोन
तलवारी तसेच एक रिकामे मॅगझीन मिळुन आली.सदर इसमांची नावे पुढिलप्रमाणे आहेत.

**१. दिलीपसिंघहरीसिंघ पवार वय ३२ वर्ष रा.प्लाट नं. ४२१ नाथनगर, नांदेड ता.जि. नांदेड,**
**२. विक्रम बाळासाहेब बोरगे वय २४ वर्षे रा. येवलारोड, विरभद्र मंदीरा जवळ वैजापुर ता.वैजापुर जि. संभाजीनगर**
**३. अनिकेत बालाजी सुर्यवशी वय २५ वर्षे रा. नवामोंढा, गणेश मंदीर जवळ नांदेड ता.जि. नांदेड.**
**४. अमनदिपसिंघ अवतारसिंग राठोड वय २५ वर्षे रा. मगनपुरा नांदेड ता.जि. नांदेड.**
**५. सद्दामहुसेन मोहंम्मद अमीन वय ३३ वर्षे रा. इतवारा मेस्को रोड, नांदेड ता.जि. नांदेड,**
**६. अक्षय रविंद्र महाले वय ३० वर्षे रा.भावसार गल्ली चोपडा ता. चोपडा जि. जळगाव,**
**७. जयेश राजेंद्र महाजन वय ३० वर्ष रा. भाटगल्ली चोपडा ता. चोपडा जि. जळगाव**

सदर संशयीतांबाबत अधिक चौकशीकेली असता ते नामचीनगुन्हेगार असल्याचे व त्यांच्यावर यापूर्वी पुढिलप्रमाणेखुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, दंगल, दहशत माजवणे, अग्निशस्त्रे व तलवार, चॉपर बाळगणे यासारखे गंभीर गुन्हे नांदेड, वैजापुर जि संभाजीनगर, तसेच चोपडा येथे यापूर्वी दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**दिलीपसिंगहरीसिंघ पवार याचेवर दाखलगुन्हे-**
१)इतवारा पोलीसस्टेशन जि.नांदेडगु.र.नं. ४४६/२०२४ भा.न्या.सं.कलम १४०,११५(२),३५१(३),३५२,३(५) सह भा.ह.का.कलम ४/२५
२)विमानतळ पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २३०/२०२० भा.द.वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६
३)नांदेडग्रामीण पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं.४२४/२०१२ भा.द.वि.कलम ३०२,२०१,१२०,३४ सह भा.ह.का.कलम ३/२५.
४)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं.२१८/२००८ भा.द.वि.कलम ३०२,३०७,१२०(ब). विधीसंघर्षीत बालक
५)वजीराबाद पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. १४३/२०१७ भा.द.वि.कलम ११५,१२०(ब) सह भा.ह.का.कलम ४/२५
६)विमानतळ पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ३९/२०१५ भा.ह.का.कलम ३/२५,७/२५,४/२५.
७)वजीराबाद पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २२/२०१८ भा.द.वि.कलम २९४,५०४,३४ सह भा.ह.का.कलम ४/२५.

**विक्रम उर्फ विकी बाळासाहेब बोरगे याचेवर वैजापुर पोलीसस्टेशन संभाजीनगर गु.र.नं. ५०३/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१०(४) सह भा.ह.का.कलम ३/२५ दाखल असुनसदरगुन्हयामध्येतो फरार आहे.**

**अनिकेत बालाजी सुर्यवंशी याचेवर दाखलगुन्हे-**
१)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं.१६०/२०२५ भा.न्या.सं.कलम ११८(२),१९१(२),१९३(३),१९०,३५२,३५१(२).
२)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ६५४/२०२४ भा.न्या.सं.कलम १०९,११५(२),३५१(३),१८९(२),१८९(४)१९०.

३)शिवाजीनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं.५११/२०२४भा.ह.का.कलम ३/२५.
४)शिवाजीनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं.५०५/२०२४भा.ह.का.कलम ४/२५.
५)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ५५८/२०२४भा.ह.का.कलम ३/२५.
६)विमानतळ पोलीसस्टेशन नांदेडा, गु.र.नं. २६९/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,३२३,३३६,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६ भा.ह.का.कलम ४/२५.
७)अर्धापुर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २५७/२०२३भा.द.वि.कलम १४३,१४७,१४९,३०७,३९५,३२३,५४,५०६ भा.ह.का.कलम ४/२५.
८)विमानतळ पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. १५२/२०२३भा.ह.का.कलम ३/२५.
९)नरखेल पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ९१/२०२३भा.ह.का.कलम ३/२५.
१०)शिवाजीनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ५०/२०२३भा.ह.का.कलम ४/२५, मपोकाकलम १३५.
११)विमानतळ पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २८/२०२३म.जु.का. १२(अ).
१२)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. ३४२/२०२२भा.ह.का.कलम ४/२५.
१३)भाग्यनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २४२/२०२२भा.द.वि.कलम ३८६,५०६,३४, भा.ह.का.कलम ४/२५.
१४)शिवाजीनगर पोलीसस्टेशन नांदेड, गु.र.नं. २८८/२०२० भा.द.वि. ३९४,३९५भा.ह.का.कलम ३/२५, ४/२५.

**अक्षय रविंद्र महाले याचेवर दाखलगुन्हे.**

१)चोपडा शहर पोलीसस्टेशनगु.र.नं. १०२/२०१६ भा.द.वि.कलम १४३,१४७,१४९,४३५,४३६,४२७,३२३, ३५३,३३२,३३३ वगैरे. इ
२)चोपडा शहर पोलीसस्टेशनगु.र.नं. ३७४/२०२१ भा.ह.का. ३/२५, ७/२५.
३)चोपडा दारुबंदी विभाग गु.र.नं. २१/२०२५ दारुबंदी अधिनीयमकलम ६५(ई).
४) चोपडा दारुबंदी विभाग गु.र.नं. ४०५/२०२५ दारुबंदी अधिनीयमकलम ६५(ई).

सदरचेगुन्हेगार अतिशय धोकादायक असुनत्यापैकी दोन आरोपीहे महाराष्ट्र धोकादायककृत्यांना प्रतिबंध अधिनियम (MPDA) कायद्यान्वयेच्या स्थानबध्दतेमधुन नुकतेचकारागृहातुन बाहेर आलेले आहेत. एक आरोपी वैजापुर, जि संभाजीनगर येथील दरोडा व आर्म अॅक्टच्या गुन्हयामध्ये फरार असलेला आहे.चोपडा येथील एका आरोपीवर पुर्वी अग्निशस्त्र बाळगल्याबाबत तसेच दंगल केल्याबाबत गुन्हे नोंद आहेत.सदरचे सर्व ०७ आरोपीहेसंगनमताने रस्तालुट व दरोड्याचीतयारीकरुन सशस्त्र स्थितीत एकत्र जमल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द चोपडा शहर पोलीसस्टेशनगु.र.नं ५८१/२०२५भा.न्या.सं. कलम ३१०(४),३१०(५), सह शस्त्र अधिनियम १९५९ चेकलम ३/२५, ४/२५ सह महा.पोलीसकायदाकलम ३७(१)(३) चे उल्लंघन कलम १३५ प्रमाणे नोंदकरण्यात आला असुन आरोपींना अटककरण्यात आले आहे व **त्यांच्याकडे मिळुन आलेले गावठी पिस्टल, तलवारी, मोबाईल फोन, रोख रक्कम, चारचाकीगाडी असा एकुण १३,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीतांना रिमांडकामी न्यायालयात हजरकरण्यात येत आहे.**

आरोपीतांबाबत केलेल्या तपासामध्ये दिसुन आले आहेकी, नांदेड येथेसदर आरोपीतांची अतिशय दहशत असुन लोकांना शस्त्रांचा धाक दाखवुन खंडणी वसुल करणे, खंडणीसाठी अपहरणकरणे, विवस्त्र करून लोकांचा छळकरणे व त्याचे व्हिडीओ तयारकरुनते इतर लोकांना दाखवुन त्यांना घाबरवणे असेकृत्येकरत असल्याचे दिसुन येत आहे. त्याबाबत सखोल तपास चालु आहे.

सदरची कारवाई श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधिक्षक जळगाव, श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगाव, श्री अण्णासाहेब घोलप, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली चोपडा शहर पोलीस निरीक्षकश्री मधुकर साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षकश्री एकनाथ भिसे,पोहेकॉ/२८९६ हर्षल पाटील, पोहेकॉ/२०८६ संतोष पारधी, पोहेकॉ/१८०५ ज्ञानेश्वर जवागे, पोकॉ/२१५८ अजिंक्य माळी, पोकॉ/५०३ अमोल पवार, पोकॉ/३२३८ मदन पावरा, पोकॉ/७६८ रविंद्र मेढे, पोकॉ/२१४५ विनोद पाटील, चालक पोहेकॉ/२०१० किरण धनगर, पोकॉ २१२५ योगेश पाटील, पोकॉ/१४४१ प्रकाशठाकरे यांनी पार पाडली असुनगुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक चेतन परदेशीहेकरत आहेत.


CAMPER



